# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग-२ राज्यशास्त्र (IKS)**

# भारतीय लोकशाहीचा इतिहास
**(History of Indian Democracy)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-२
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : २००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-49570-64-1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र.संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■


अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर

- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा

- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा

- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर

- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा

- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर

- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली

- **प्रा. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

बी. ए. भाग २ च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक (IKS) भारतीय लोकशाहीचा इतिहास हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

भारतीय लोकशाहीचा इतिहास, आधुनिक भारतीय लोकशाही इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व राज्यशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. रविंद्र भणगे, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक व सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–३** | |
| **प्रा. डॉ. रविंद्र भणगे,**<br>राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **१** |
| **श्री. मोसिम पठाण**<br>राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **२** |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे**

राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सत्र-३ (IKS) | |
| १. | भारतीय लोकशाहीचा इतिहास | १ |
| २. | आधुनिक भारतीय लोकशाही | १३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# भारतीय लोकशाहीचा इतिहास
## (History of Indian Democracy)

**१.0 उद्दिष्ट्ये**
**२.0 प्रस्तावना**
**३.0 विषय विवेचन**
**४.0 सारांश**
**५.0 पारिभाषिक शब्द**
**६.0 स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे**
**७.0 सरावासाठी स्वाध्याय**
**८.0 अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

### १. उद्दिष्ट्ये :

१)प्रस्तुत घटकामध्ये भारतीय लोकशाहीचा इतिहास सविस्तर अभ्यासणे.

२)भारतीय लोकशाहीचा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा प्रवास या प्रकरणात अभ्यासला जाणार आहे.

३)भारतीय लोकशाहीचे उगमस्त्रोत, भारतीय लोकशाहीवरील विविध घटकांचा प्रभाव यांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला जाणार आहे.

४) भारतीय संविधानातील लोकशाही मुल्ये समजून घेणे.

### २. प्रस्तावना :

लोकशाही हा शासनाचा अत्यंत प्राचीन प्रकार आहे. प्राचीन ग्रीक नगर राज्यातील प्रत्यक्ष लोकशाहीच्या जागी राष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर प्रातिनिधिक लोकशाही पद्धत सुरू झाली आणि आजच्या काळात जगातील शासन प्रातिनिधिक लोकशाहीच्या तत्वानुसार चालत असलेले दिसून येते. प्राचीन ग्रीक विचारवंत प्लेटो पासून ते आजपर्यंत राज्यशास्त्रामध्ये लोकशाही हा मध्यवर्ती विषय राहिलेला आहे. लोकशाहीला इंग्रजीमध्ये 'डेमोक्रसी'(Democracy असे म्हणतात त्याची उत्पत्ती 'डेमॉस' Demos (लोक) आणि 'क्रेटॉस' (Kratos (सत्ता) या शब्दांपासून झाली त्यांचा अर्थ लोक आणि सत्ता असा होतो म्हणून डेमॉक्रसी म्हणजे लोकांचे राज्य, लोकसत्ता किंवा लोकशाही बहूसंख्य लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही असा अर्थ ही घेतला जातो. अब्राहम लिंकन यांनी 'लोकशाहीची लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य' अशी व्याख्या केली आहे. लोकशाही हा केवळ शासन प्रकार नाही तो एक जीवनमार्ग आहे लोकशाही ही एक नैतिक संकल्पना आहे. ग्रीक नगरराज्यामध्ये शासनाचे सर्व निर्णय नगरातील सर्व नागरिकांची सभा बोलवून प्रत्यक्ष मतदानातून घेतले जात असे म्हणून तेथील लोकशाहीला प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणत. पुढील काळात इंग्लंडच्या जनतेने राजाकडून नागरी हक्कांची सनद इ. स. १२१५ ला मिळवली, तिला मॅग्नाकार्टा असेही म्हणतात. आधुनिक लोकशाहीचा तो

पहिला टप्पा मानला जातो. १३ अमेरिकन वसाहतींनी ब्रिटिश सत्ता झुगारून देऊन लोकशाही स्वरूपाचे संविधान स्वीकारले. फ्रेंच जनतेने तेथील अनियंत्रित राजेशाही सरंजामदार आणि बुरसटलेली धर्मसत्ता यांच्या विरूद्ध बंड पुकारले आणि फ्रान्सची राज्यकांती घडून आली. त्यानंतरही खरी लोकशाही मिळविण्यासाठी तेथील जनतेला पुढील १०० वर्ष संघर्ष करावा लागला. औदयोगिक कांतीमूळे लोकशाहीच्या जडणघडणीस पाश्चात्य देशामध्ये मोठी चालना मिळाली नवनवे वैज्ञानिक शोध लागले, यंत्रे निर्माण झाली, मोठे कारखाने निघून त्यात हजारो कामगारांना रोजगार मिळाला, उत्पादनात वाढ झाली, शेती व्यवसाय दुय्यम ठरला त्यामुळे कामगार वर्गात जागृती झाली. आपल्या हक्काची जाणीव झाली. शिक्षणातून नवमुल्यांचे संस्कार घेतलेले लोक हक्कासाठी लढू लागले. कालांतराने त्यांना यश मिळाले, मताधिकार मिळाला त्याचा विस्तार झाला आणि लोकशाही अस्तित्वात आली. संपूर्ण जगामध्ये लोकशाहीचा मुल्यविचार व आदर्श स्वीकारले जाऊ लागले. लोकशाही म्हणजे केवळ राजकीय व्यवस्था नाही तर ती जीवनाकडे पाहण्याची वृत्ती, दृष्टिकोण आहे. व्यक्तीच्या सर्व जीवनात आणि संबंधात लोकशाही मुल्ये प्रभावीपणे व्यक्त होणे खऱ्या लोकशाहीला अपेक्षित आहे.

भारतीय लोकशाहीला प्राचीन परंपरा व इतिहास आहे. भारतीय लोकशाही ही सिंधू संस्कृतीच्या काळापासून ते ब्रिटीश काळापर्यंतचा प्रदीर्घ इतिहास आहे.याच प्रदीर्घ इतिहासाची सविस्तर चर्चा आपण प्रस्तुत प्रकरणात करणार आहोत.

**३. विषय विवेचन :**

**३.१ भारतीय लोकशाहीचा उदय व विकास :**

प्राचीन काळापासून आजपर्यंत भारत लोकशाही तत्त्वे आणि लोकशाही संस्थांनी आकाराला आला आहे. त्याच तत्वे व संस्थानी भारताच्या प्रगतीचा आणि सर्वसमावेशकतेचा पाया घातला आहे.भारतातील लोकशाही तत्त्वे आणि परंपरांचे सर्वात जुने स्त्रोत म्हणजे सिंधू संस्कृती, ऋग्वेदीक काळखंड, महाजन पदांचा काळखंड, संगम कालखंड होय. नंतर उत्तरमेरू आणि अनुभव मंडपाची उदाहरणे भारताच्या समृद्ध लोकशाही परंपरेचे पुरावे आहेत,ज्यात सर्वसमावेशक शासन, सहभागात्मक निर्णय घेणे आणि संवादाच्या सामर्थ्यावर जोर देण्यात आला आहे. या ऐतिहासिक उदाहरणांचा आणि त्यांच्या परिणामांचा शोध घेतल्यास, भारताच्या लोकशाही परंपरेचा वारसा उलगडत जातो जो आजही देशाच्या वाटचालीला सतत मार्गदर्शन करत आहे. महाभारत,पाणिनीची अष्टाध्यायी आणि बौद्ध धर्मग्रंथांमधील गण आणि संघ अशा संकल्पनांच्या उल्लेखांतून भारताचा लोकशाही वारसा त्याच्या प्राचीन इतिहासामध्ये स्पष्टपणे दिसतो.

सिंधू संस्कृती ही भारतातील सर्वात प्राचीन संस्कृती मानली जाते. या संस्कृतीतील नगरराज्यांमध्ये लोकशाही तत्त्वे अस्तित्वात होती. त्यावेळी लोकशाही मूल्यांना अनुसरून राजकीय संस्था निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती . आपल्या नगरासमोरील प्रश्न सोडवण्यासाठी लोक एकत्रीत येवून चर्चा करत असत व आपल्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीला निर्णय घेण्याचे अधिकार सुपूर्द करत असत.सिंधु संस्कृती मध्ये स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व मान्य केल्याचे दिसते. व्यक्तीला आपले मत खुलेपणाने मांडण्याचा अधिकार होता यावरून असे दिसते की व्यक्तीस्वातंत्र्याच्या मूल्याची रुजुवात या काळात केली गेली.

ऋग्वेदकालीन भारतातही लोकशाही तत्त्वे अस्तित्वात होती. या काळात पंचायती व्यवस्था ही एक लोकशाही संस्था होती. पंचायती व्यवस्था ही गावातील लोकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था होती. वैदीक काळामध्ये सभा,समिती अशा राजकीय संस्था अस्तित्वात होत्या जिथे लोक एकत्र येवून राजकीय निर्णय करत असत. याच सभा, समिती च्या माध्यमातून राजाची निवड केली जात असे. या व्यवस्थेच्या माध्यमातून कर

यंत्रणा राबविली जात असे. गावाचे रक्षण करण्यासाठी राजाला कररूपी मोबदला दिला जात असे त्याला 'बली' म्हंटले जाई. यावरून असे लक्षात येते की आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये असणारी वैशिष्ठे ही तत्कालीन राजकीय व्यवस्थेमध्ये प्राथमिक अवस्थेत आकाराला येत असल्याचे दिसते.

या संदर्भांपैकी, गण आणि संघ या शब्दांचा वापर करून, शासनाच्या प्रजासत्ताक स्वरूपाचा उल्लेख करणारा महाभारत हा पहिला मजकूर स्रोत आहे . यावरून असे दिसून येते की स्वराज्य संस्था आणि सामूहिक निर्णय घेण्याची संकल्पना पूर्वीपासून प्रचलित होती. महाभारतातील सुरुवातीच्या लोकशाहीचे एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे समिती होय. तो प्रत्यक्ष लोकशाहीत एक प्रयोग म्हणून कामाला आला. ही व्यवस्था आजही जगाच्या काही भागात अस्तित्वात आहे. समितीने निर्णय प्रक्रियेत नागरिकांच्या सक्रिय सहभागासाठी व्यासपीठ म्हणून काम केले. राजांची निवड आणि पुनर्निवड करण्यात, लोकप्रिय निवड आणि उत्तरदायित्वाचे लोकशाही तत्त्व प्रदर्शित करण्यात याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. राजा (राजन) साठी समितीमध्ये उपस्थिती अनिवार्य होती, लोकांना त्यांच्या संवादाचे महत्त्व पटवून दिले जाई.

समिती व्यतिरिक्त सभा ही वैदिक काळातली आणखी एक उल्लेखनीय सभा होती. ती समितीशी जवळून निगडीत होती. सार्वजनिक हिताच्या विषयांवर वादविवाद आणि चर्चा आयोजित करण्यासाठी सभेने एक संसदीय संस्था म्हणून काम केले, ज्यामध्ये मुक्त संवाद आणि विचार विमर्शाची लोकशाही नीति प्रतिबिंबित होते. सभेचे अध्यक्ष, सभापती हे पद अत्यंत आदराचे मानले जात असे. आधुनिक काळातील संसदेचे वरिष्ठ सभागृह (राज्यसभा) मोठ्या प्रमाणावर सभेचे उत्तराधिकारी मानले जाते. परिणामी, समिती आधुनिक काळातील लोकसभा किंवा संसदेच्या कनिष्ठ सभागृहाचे प्रतिनिधित्व करते.

बुद्ध काळामध्ये महाजनपदे व गणराज्ये अस्तित्वात आल्याचे दिसते. बुद्धकालीन राजकीय व्यवस्थेमध्ये आजच्या आधुनिक लोकशाहीतील मूल्यांचा उद्गम शोधता येतो. त्यावेळी १६ महाजन पदे व १० गणराज्ये अस्तित्वात आली होती. गणराज्यामध्ये राजाची निवड ही वंश परंपरागत पद्धतीने न होता लोकांकडून राजा निवडून राज्यकारभार केला जात होता. बुद्धकालीन गणराज्य व्यवस्थेचे वर्णन डॉ.अमर्त्य सेन यांनी 'चर्चात्मक लोकशाही' असे केले आहे. यावरून असे म्हणता येईल की आजच्या भारतीय लोकशाहीच्या प्रेरणा प्राचीन काळापासून अस्तित्वात होत्या. या प्राचीन लोकशाही व्यवस्थेत भारतातील सहभागात्मक शासन, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग, सामूहिक शहाणपणाचे तत्त्व आणि विचार मांडण्याचे स्वातंत्र्य ही लोकशाही मूल्ये अस्तित्वात होती.

भारताच्या लोकशाही वारशाच्या विशाल पटलावर, अनुभव मंटप आणि उत्तरमेरूर शिलालेख लक्षणीय उदाहरणे आहेत. अनुभव मंटपाची स्थापना १२ व्या शतकात कर्नाटकात दूरदर्शी समाजसुधारक बसवण्णा यांनी केली होती आणि त्यामुळे भारताच्या इतिहासात याला खूप महत्त्व आहे. ही संस्था आधुनिक संसदेची प्रारंभिक आवृत्ती म्हणून पाहिली जाऊ शकते. जिथे समाज, अर्थव्यवस्था, संस्कृती आणि अध्यात्म यांचा समावेश असलेल्या विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी गूढवादी, संत आणि तत्त्वज्ञ एकत्र आले. बसवण्णा यांच्या दूरदृष्टीमुळे इंग्लंडमध्ये प्रसिद्ध मॅग्ना कार्टा उदयास येण्याच्या शतकापूर्वी या सार्वजनिक मंचाची स्थापना झाली. कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण येथे स्थित, अनुभव मंडपाने समतावादी पुनर्जागरण घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे भारतातील संसदीय लोकशाहीची उत्पत्ती झाली. सर्वसमावेशकता आणि प्रगतीशील विचारसरणीचे वातावरण जोपासण्यासाठी, ज्ञान आणि अंतर्दृष्टीची देवाणघेवाण करण्यासाठी विद्वान, कवी आणि तत्त्वज्ञ या ठिकाणी एकत्र आले. ही परंपरा भारताच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक वारशात खोलवर रुजलेल्या लोकशाही मूल्यांचे उदाहरण देते.

मध्ययुगीन काळात प्रामुख्याने भारतामध्ये भक्ती आणि सुफी परंपरेने भारतीय लोकशाहीला प्रभावित केले असे म्हणता येईल.भक्ती चळवळीचा प्रमुख उद्देश हा समतामुलक समाजाची निर्मिती करून विविध समूहांमध्ये बंधुभाव निर्माण करणे हा होता. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या लोकशाही मुल्यांचा प्रचार प्रसार भक्ती चळवळीने केल्याचे आपल्याला दिसते. आधुनिक लोकशाहीत अभिप्रेत असलेली सामाजिक न्यायाची संकल्पना भक्ती चळवळीच्या माध्यमातून आग्रहाने मांडली गेल्याचे आपल्याला दिसते. भक्ती चळवळ ही धार्मिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती तर ती एक व्यापक राजकीय चळवळ होती.यामध्ये प्रामुख्याने ज्यांचे योगदान अधोरेखित करायला हवे ते म्हणजे महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, नामदेव व तुकाराम हे संत होय. त्याचबरोबर गुजरात मधील नरसिंह मेहता आणि अखा, उत्तर भारतातील संत कबीर आणि सूरदास, पंजाबमधील गुरुनानक यांचा उल्लेख करायला हवा.

भक्ती चळवळीला समकालीन असणारी परंतु इस्लाम च्या प्रभावातून पुढे आलेली परंपरा म्हणजे सुफी परंपरा होय. मध्ययुगीन काळात सामाजिक सलोखा व सहअस्तित्वाच्या मूल्याचा आग्रह सुफी चळवळीने धरला असे म्हणता येईल. हिंदू-मुस्लीम एकतेची चर्चा सुफी चळवळीने व्यापक स्वरुपात घडवून आणली. भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने भारतीय समाजामध्ये सामाजिक सलोख्याचे मूल्य रुजविण्याचे प्रयत्न सुफी चळवळीने केले असे म्हणता येईल. भारतामध्ये निजामुद्दीन औलिया, मोइनुद्दिन चिश्ती, कुतुबुद्दिन बख्तियार काकी, शेख सलीम चिश्ती अशा काही सुफी चळवळीतील संताची नावे सांगता येतील.

### ३.२ भारतातील आधुनिक लोकशाहीचा विकास :

ब्रिटिश राजवटीपासून भारतात लोकशाहीला पुन्हा चालना मिळाली. ब्रिटिशांनी भारतात निवडणुका, न्यायव्यवस्था आणि मूलभूत अधिकार यांसारख्या इतर लोकशाही संस्थांची आणि संकल्पनांची पुनर्स्थापना केली. आधुनिक भारतीय लोकशाही व्यवस्थेची रुजुवात होण्यासाठी विशेषत: १७७३ सालच्या रेग्युलेटिंग कायद्या पासून सुरुवात झाली असे म्हणता येईल. या कायद्यान्वये बंगालचा गव्हर्नर हा गव्हर्नर जनरल झाला व त्यास सहाय्य करण्यासाठी चार सदस्यीय कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात आले आणि याचेच रूपांतर आधुनिक लोकशाहीतील मंत्रिमंडळ नावाच्या मोठ्या राजकीय व्यवस्थेत झाल्याचे आपल्याला दिसते. त्याचबरोबर याच कायद्यान्वये सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करून आधुनिक न्याय मंडळाची पाया भरणी केली गेली. त्यानंतर आलेल्या विविध कायद्यांच्या द्वारे विविध लोकशाही संस्था, राजकीय व्यवस्था, निवडणुकीचे तत्व, नागरी सेवा, संघराज्यात्मक व्यवस्था, मताधिकार, कायदेमंडळ अशा विविध आधुनिक लोकशाही संस्था व मूल्ये निर्माण केली गेली. ब्रिटिश काळामध्ये घडलेल्या लोकशाहीसाठीचे पुर्नप्रयत्न व सुधारणा या प्रामुख्याने भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक पार्श्वभूमीतून घडल्या आहेत. पुढे भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या संस्कारातूनच आधुनिक भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने स्थापन होण्यास सुरुवात झाली.

### ३.३ ब्रिटीश काळखंडात भारतीय लोकशाहीचा विकास :

ब्रिटीशांनी भारतीय लोकशाहीला रचनात्मक रूप देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावलेली आपल्याला दिसून येते.विविध कायद्यांच्या माध्यमातून संस्थात्मक लोकशाही रुजविण्याचे काम ब्रिटीशांनी केल्याचे आपल्याला दिसते.विविध कायद्यातील तरतुदी संक्षिप्त स्वरूपात खालीलप्रमाणे आहेत.

**अ) रेग्युलेटिंग कायदा (१७७३) :**

या कायद्यातील प्रमुख तरतुदींचा उल्लेख वरती केलेला आहे. परंतु लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची तरतूद या कायद्याने केली ती म्हणजे इस्ट इंडिया कंपनी वर ब्रिटीश सरकारचे मर्यादित नियंत्रण राहील. यामुळे ब्रिटीश काळात पहिल्यांदा भारतामध्ये शासन यंत्रणेचा अंमल सुरु झाल्याचे दिसते तत्पूर्वी एका व्यापारी कंपनीचा अंमल भारतामध्ये होता. या कायद्यामुळे भारतीय लोकांना सरकार/ शासन हे घटक प्राप्त झाले असे म्हणता येते.

**ब) पिट्स इंडिया कायदा (१७८४) :**

१) दुहेरी शासन पद्धती ची स्थापना या कायद्याने झाली.

२) ब्रिटीश सरकार ला भारतातील राज्य कारभारासंबंधी इस्ट इंडिया कंपनीवर नियंत्रणाचे संपूर्ण अधिकार देण्यात आले.

**क) सनद कायदा (१८३३) :**

१) या कायद्याने बंगालचा गव्हर्नर हा भारताचा गव्हर्नर जनरल बनला.

२) या कायद्यान्वये पहिल्यांदा भारत सरकारची स्थापना करण्यात आली.

३) भारतामध्ये केंद्रीय सरकारची व्यवस्था निर्माण करण्यात आली.

**ड) सनद कायदा (१८५३) :**

१) या कायद्याने सत्तेच्या पृथ्थकरणाचे (Separation of Power) तत्त्व अंमलात आणले.

२) नागरी सेवांमध्ये जाण्यासाठी खुली स्पर्धा या कायद्याद्वारे आणली गेली.

३) या कायद्यान्वये गव्हर्नर जनरल कायदे मंडळास भारतीय कायदे मंडळ असे नाव देण्यात आले आणि या कायदेमंडळाने त्यावेळी ब्रिटीश संसदेसारखेच पण मर्यादित कायदे निर्मितीचे कार्य केल्याने यास 'मिनी पार्लियामेंट' असे संबोधले गेले.

**इ) भारत सरकार कायदा (१८५८) :**

१) या कायद्याने व्हाईसरॉय हे पद निर्माण केले.

२) या कायद्याद्वारे दुहेरी शासन पद्धती बंद करण्यात आली.

**ई) भारत परिषद कायदा (१८६१) :**

१) या कायद्याने भारतीय लोकांचा सहभाग असलेल्या प्रातिनिधिक कायदेमंडळाची स्थापना केली. भारतीय सदस्य जरी निवडून आलेले नसले तरी भारताच्या व्हाईसरॉय कडून त्यांची नेमणूक होत असे.

२) या कायद्याने सत्तेच्या विकेंद्रीकरणाची सुरुवात केली.

३) या कायद्याने अध्यादेश काढण्याचा अधिकार व्हाईसरॉय ला दिला गेला.

**उ) भारत परिषद कायदा (१८९३) :**

१) या कायद्याने कायदेमंडळात भारतीयांची सदस्य संख्या वाढविली.

२) या कायद्याने कायदेमंडळाचे अधिकार वाढवून अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचे अधिकार देण्यात आले.

३) या कायद्याने मर्यादित आणि अप्रत्यक्ष निवडणुकांची सुरुवात केली.

**ऊ) भारत परिषद कायदा (१९०९) :**

१) या कायद्याने कायदेमंडळाचे अधिकार वाढवून त्याच्या सदस्यांना चर्चा करण्याबरोबरच पूरक प्रश्न विचारण्याचे अधिकार देण्यात आले.

२) या कायद्याने आरक्षणाचे तत्व अंमलात आणले.

**ए) भारत सरकार कायदा (१९१९) :**

१) या कायद्याद्वारे भारतामध्ये जबाबदार शासन पद्धतीची सुरुवात केली.

२) या कायद्याने द्वीगृही कायदेमंडळाची स्थापना करण्यात आली.

३) याद्वारे भारतामध्ये प्रत्यक्ष निवडणुकांची सुरुवात करण्यात आली.

४) या कायद्याद्वारे मर्यादित मताधिकार देण्यात आला.

**ऐ) भारत सरकार कायदा (१९३५) :**

१) या कायद्याद्वारे अखिल भारतीय संघराज्य स्थापन करण्यात आले.

२) या कायद्याने केंद्र व राज्य यांच्यामध्ये सत्ता विभाजनाचे तत्व अंमलात आणले.

३) याद्वारे केंद्र व राज्य यांच्या अधिकारांची सूची तयार केली गेली व सत्ता विभाजन निश्चित करण्यात आले.

४) या कायद्याद्वारे मर्यादित अधिकार काही प्रमाणात वाढविण्यात आला.

५) या कायद्याद्वारे केंद्रीय बँकेची स्थापना करण्यात आली.

६) या कायद्याने लोकसेवा आयोगाची स्थापना केली.

७) या कायद्याद्वारे संघीय न्यायालयाची स्थापना करण्यात आली.

**ओ) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा (१९४७) :**

१) या कायद्याद्वारे भारतातून ब्रिटीशांचा अंमल संपुष्टात आला आणि भारत एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून निर्माण झाले.

२) या कायद्याद्वारे भारताच्या संविधान सभेला संविधान निर्मितीसाठी सर्वोच्च अधिकार देण्यात आले.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम भारतीय घटनापरिषदेची स्थापना करून लोकशाहीत अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या सर्वसमावेशक राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली. भारताची वाटचाल ही लोकशाहीच्या कोण-कोणत्या मूल्याच्या आधारे होईल हे भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्पष्ट केले गेले व आजच्या सार्वभौम, लोकशाही, गणराज्य, धर्मनिरपेक्ष, समाजवादी लोकशाही देशाचा पाया रचला गेला.

### ३.४ भारतीय लोकशाहीची रचना :

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय लोकशाहीची वाटचाल सुरु झाली. भारतीय लोकशाही ही भारताच्या प्राचीन परंपरांचा वारसा, जागतिक लोकशाहीचे अनुभव, संमिश्र संस्कृती, सहअस्तित्व अशा मूल्यांच्या आधारे आकाराला आली आहे. भारतीय लोकशाही मध्ये राज्यघटनेच्या आधारे निर्माण केलेल्या संस्था, संकल्पना, मूल्ये यांना अतिशय महत्व आहे. भारताने उपलब्ध लोकशाही व्यवस्थेच्या पर्यायांपैकी भारताच्या दृष्टिकोनातून योग्य व समर्पक संघराज्यात्मक संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला.

जगभरातील विचारवंत ही भारतीय लोकशाही व्यवस्थे बद्दल आस्था बाळगून असतात.भारतीय लोकशाही बद्दल काही विचारवंतांचे मत जाणून घेऊ ;

* डॉ. अमर्त्य सेन, भारतीय लोकशाही ही एक अशी यशस्वी प्रयोगशाळा आहे जी जगभरातील लोकाना प्रेरणा देते.

* जॉन एफ केनेडी, भारतीय लोकशाही ही जगातील सदृढ व आदर्श व्यवस्था आहे.

* मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर, भारतीय लोकशाहीचे उदाहरण पाहून इतर देशही लोकशाहीकडे वळतील.

*** भारतीय संसदीय लोकशाही व्यवस्था :-**

भारताने संसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. भारतासारख्या खंडप्राय व विविधतेने समृद्ध अशा देशात सर्वांचे प्रतिनिधित्व राज्यकारभारात असणे आवश्यक होते. त्यामुळे भारतीय राज्यघटनेमध्ये संसदीय लोकशाही व्यवस्थचा अवलंब करण्यात आला. संसदीय लोकशाहीत प्रामुख्याने एकगृही किंवा द्विगृही कायदेमंडळ अस्तित्वात असते. भारतीय लोकशाही मध्ये संघराज्य व्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे द्विगृही कायदेमंडळ स्वीकारण्यात आले. राष्ट्रपती, राज्यसभा व लोकसभा यांना मिळून भारतीय संसद तयार होते. त्यातील वरिष्ठ सभागृहास 'राज्यसभा' व कनिष्ठ सभागृहास 'लोकसभा'असे संबोधले जाते. राज्यसभा हे सभागृह राज्यांचे प्रतिनिधित्व करते व लोकसभेमध्ये जनतेचे प्रतिनिधि निवडून आलेले असतात राज्यसभा कधीही विसर्जित होत नाही त्यामुळे त्यास स्थायी सभागृह असे म्हंटले जाते परंतु राज्यसभेवर निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ ६ वर्षांचा असतो तर लोकसभा हे सभागृह दर पाच वर्षानी विसर्जित होते व नव्याने निवडणूक होऊन सदस्यांची निवड केली जाते.

*** संसदीय लोकशाहीची वैशिष्टये :**

आज जगातील अनेक देशांमध्ये संसदीय लोकशाही शासनव्यवस्था दिसत असली, तरी देशपरत्वे या व्यवस्थेचे स्वरूप आणि कार्यपद्धतीत फरक आहे. तिची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :

**राज्यप्रमुख आणि शासनप्रमुख यांत फरक :**

इंग्लंडमध्ये 'राजा' हा राज्याचा प्रमुख असला, तरी शासनव्यवस्थेचे प्रमुखत्व पंतप्रधानांकडे आहे. सर्व कारभार राजाच्या नावाने पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली त्यांचे मंत्रिमंडळ करीत असते. प्रौढ मतदानपद्धतीने (इंग्लंडसारख्या) व सापेक्ष बहुमताने (ही मतदानपद्धत संविधानाने ठरविलेली नसून कायदयाने ठरविलेली आहे) निवडून आलेले प्रतिनिधी असलेल्या सभागृहास (संसदेस) मंत्रिमंडळ जबाबदार राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. या अर्थाने पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी खरे सत्ताधीश असतात, तर राजाचे स्थान नाममात्र प्रमुख असे आहे. काही देशांमध्ये नाममात्र प्रमुख पद 'अध्यक्ष', 'राष्ट्रपती' किंवा तत्सम व्यक्तीकडे असते परंतु पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ (कार्यकारी मंडळ) हेच खरे सत्ताधारी असतात. भारतात संविधानाने राष्ट्रपतीस अनेक अधिकार दिले असले, तरी प्रत्यक्षात ते अधिकार पंतप्रधान व मंत्रिमंडळ वापरील, हे त्यात अनुस्यूत आहे. शिवाय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार हे अधिकार वापरले जातील, असा स्पष्ट उल्लेख संविधानात आहे.

**विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांची घनिष्ठता:**

संसदीय लोकशाहीत विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांचे संबंध अत्यंत घनिष्ठ आणि अन्योन्य स्वरूपाचे असतात. विधिमंडळात म्हणजे कनिष्ठगृहात बहुमत असणाऱ्या पक्षाचा किंवा पक्षांच्या युतीचा नेता पंतप्रधान बनतो व आपले सहकारी निवडतो. धोरण ठरविण्यात आणि ते अंमलात आणण्यात तो मंत्रिमंडळाचे व संसदेचे (प्रतिनिधिगृहाचे) नेतृत्व करतो. पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी हे विधिमंडळाचे सदस्य असणे अनिवार्य असते. जोपर्यंत बहुमताचा पाठिंबा असतो, तोपर्यंत पंतप्रधान अधिकार पदावर राहू शकतो. या अर्थाने तो आणि त्याचे मंत्रिमंडळ विधिमंडळाला जबाबदार असते परंतु काही वेळा राजकीय कारणांनी किंवा विशेष परिस्थितीत विधिमंडळाची निर्धारित मुदत संपण्याअगोदर पंतप्रधानाने शिफारस केल्यास विधिमंडळ बरखास्त केले जाऊ शकते. म्हणजे जसे, पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळाचे अस्तित्व विधिमंडळाच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. त्याप्रमाणे काही वेळा विधिमंडळाचे अस्तित्वही पंतप्रधानांच्या निर्णयावर अवलंबून असते. या अर्थाने त्यांचे संबंध अन्योन्य आहेत. संसदीय लोकशाहीतील विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळातील सत्ताविभाजन अध्यक्षीय लोकशाहीप्रमाणे अत्यंत काटेकोर असे नसते.

**संसदेची सर्वोच्चता :**

इंग्लंडमध्ये संसदेचे सार्वभौमत्व मानलेले आहे. गेल्या सातशे वर्षांपेक्षा अधिक काळात विकसित होत गेलेल्या या पद्धतीत, सत्ता राजाकडून लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संसदेकडे आली. राजाचे स्थान नाममात्र राहिले. त्यामुळे बहुमताने ठराव करून किंवा कायदा करून संसद राजकीय क्षेत्रात काहीही करू शकते, अशी एक धारणा आहे. संसदेने केलेल्या कृत्याला आव्हान देता येत नाही. या अर्थाने संसद सार्वभौम असल्याचे मानले आहे परंतु काही विचारवंतांच्या मते संसदेचे सार्वभौमत्व हा एक भ्रम आहे. इंग्लंडचा अपवाद सोडल्यास अन्य सर्व देशांमध्ये लिखित संविधानाव्दारे संसदेचे गठन होते. त्यामुळे संसद ही संविधानाची निर्मिती ठरते. संसदेला संविधानाच्या चौकटीतच कार्य करता येते. या ठिकाणी संविधान सर्वोच्च ठरते आणि संसद त्याची निर्मिती ठरते. ही दोन्ही मते संबंधित राष्ट्रांच्या संदर्भात संयुक्तिक असली, तरी ठरलेल्या चौकटीत संसदेचे स्थान आणि महत्त्व अन्य संस्थांच्या तुलनेत महत्त्वाचे आहे.

संसदीय लोकशाहीत वरील वैशिष्टये असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात या कार्यपद्धतीच्या वास्तव स्वरूपात देशपरत्वे फरक पडलेला आढळतो. इंग्लंडमधील संसदीय लोकशाही द्विपक्षीय स्वरूपाची आहे. तेथे संमिश्र सरकार हे अपवादात्मक स्थितीत अधिकारावर येते, तर अन्य युरोपियन देशांत संमिश्र सरकारे आणि बहुपक्षपद्धती आढळते. भारतासारख्या देशात प्रारंभी एकपक्ष प्रबल पद्धतीच्या प्रभावाखाली संसदीय लोकशाही स्थिर झाली, तर आता बहुपक्ष पद्धती आणि केंद्र व राज्य स्तरावर विभिन्न पक्ष, पक्ष गट यांची पक्षीय किंवा संमिश्र सरकारे अधिकारावर येत असलेली दिसतात. निर्वाचन पद्धती, नोकर भरती, शासकीय कर्मचाऱ्यांची राजकीय तटस्थता, मध्यवर्ती सत्ता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील संबंध किंवा संघराज्यव्यवस्थेतील केंद्र आणि राज्य यांतील संबंध यांबाबत आपल्याला वास्तवात संसदीय लोकशाहीचे संकेत, परंपरा, कार्यपद्धती आणि कार्यक्षमता याबद्दल जगभर विविधता दिसून येते.

**स्वतंत्र न्यायमंडळ :**

भारतीय लोकशाही मध्ये स्वतंत्र न्यायमंडळाची स्थापना करण्यात आली. भारतीय राज्यघटनेने सत्ता विभाजनाचा सिद्धांत स्वीकारला आहे. त्यामध्ये कायदे करण्याचे अधिकार कायदेमंडळास, कायद्याची अंमलबजावणी

करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास व कायद्यांचा अर्थ लावण्याचा अधिकार न्याय मंडळास देण्यात आला आहे. त्यानुसार स्वतंत्र न्याय मंडळाची रचना करण्यात आली आहे. भारतीय न्यायमंडळ ही एकेरी स्वरूपाचे आहे. त्यामध्ये सर्वोच्च स्थानी भारताचे सर्वोच्च न्यायालय आहे त्यानंतर राज्यांमधील उच्च न्यायालये, जिल्हा न्यायालय व इतर कनिष्ट न्यायालये अशी श्रेणीबद्ध रचना करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय हे सर्व भारतामध्ये सर्वच न्यायालयाना बंधनकारक असतात. उच्च न्यायालयांचे कार्यक्षेत्र संबंधित राज्यापुरते मर्यादित असते तर जिल्हा न्यायालये व कनिष्ठ न्यायालये त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते न्याय निर्धारणाचे कार्य करतात.

**स्वायत्त केंद्रीय निवडणूक आयोग व इतर घटनात्मक संस्था :**

कोणत्याही लोकशाही मध्ये सार्वत्रिक निवडणूक अतिशय महत्वाची असते. लोकशाही मध्ये सरकार निवडण्याचे अधिकार नागरिकांना जरी असले तरी त्या अधिकाराचा वापर नागरिक फक्त निवडणुकीच्या माध्यमातून करू शकतात. त्यामुळे लोकशाही मध्ये पारदर्शक निवडणूका अत्यंत महत्वाच्या असतात. लोकशाही सक्रिय व प्रभावी ठेवण्याचे काम निवडणुकांच्या माध्यमातून नागरिक करत असतात. अशा निवडणूका घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना करून तयार करण्यात आली आहे. त्याचबरोबर लोकशाही मध्ये नागरिकांचे विविध अधिकार जपण्यासाठी, विकासात्मक धोरण ठरविण्यासाठी इतरही विविध संस्थांची स्वतंत्र निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये केंद्रीय वित्त आयोग, लोकसेवा आयोग, नीती आयोग, लोकपाल, नियंत्रक व महालेखापाल अशा विविध संस्थात्मक संघटना निर्माण करण्यात आल्या आहेत. सर्व संस्था भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी कार्यरत आहेत. लोकशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी सर्वच घटकांनी जागृतपणे योगदान देणे आवश्यक आहे.

**३.५ भारतीय संविधानातील लोकशाही मुल्ये :**

भारताचे संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब आहे. भारताच्या संविधानामध्ये लोकशाहीला अतिशय महत्व दिले गेले आहे. भारतीय संविधानातील विविध अनुच्छेदांच्या माध्यमातून लोकशाही मुल्ये रुजविण्याचे काम संविधान निर्मात्यांनी केले आहे. संविधानातील लोकशाही मुल्ये ही समाजामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रस्थापित करण्यासाठी महत्वाची आहेत. भारतीय विविध लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब दिसते.त्यापैकी स्वातंत्र्य,समता,बंधुता, न्याय अशा काही मुल्यांची चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

**अ) स्वातंत्र्य :** भारतीय संविधानामध्ये स्वातंत्र्य हे मूल्य अतिशय महत्वाचे मानले गेले आहे. भारतीय संविधानामध्ये व्यक्तीला नागरिक म्हणून स्वातंत्र्य बहाल केले आहे. कोणत्याही भारतीय नागरिकाला स्वातंत्र्य हे मुलभूत अधिकार म्हणून बहाल करण्यात आले आहे. संविधानाच्या अनुच्छेद १२ ते ३४ मध्ये मुलभूत अधिकार दिलेले आहेत. त्यापैकी अनुच्छेद १९ मध्ये अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे. त्याचबरोबर कोणताही व्यवसाय करण्याचे, मुक्त संचार करण्याचे, संघटना स्थापन करण्याचे व माध्यम स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले. स्वातंत्र्य हे मूल्य लोकशाहीच्या दृष्टीने महत्वाचे आहे. स्वातंत्र्याशिवाय लोकशाहीची कल्पना करणे अशक्य आहे.

**ब) समता :** लोकशाहीमध्ये समता हे मूल्य पायाभूत मूल्य मानले गेले आहे. समाजामध्ये विषमता असेल तर लोकशाही रुजू शकत नाही. समाजामध्ये आर्थिक, सामाजिक व राजकीय समता असल्याशिवाय लोकशाही टिकू शकत नाही. भारतीय संविधानाने समतेचे मूल्य आग्रहाने प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. अनुच्छेद १४

ते १८ मध्ये समतेच्या मूल्याची प्रस्थापना करण्याचे प्रयत्न केले आहे. अनुच्छेद १४ नुसार कायद्यासमोर सर्व समान हे तत्व पाळणे बंधनकारक केले आहे. कोणतीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही. अनुच्छेद १५ व १६ नुसार समाजातील मागास व वंचित घटकांना समान संधी प्राप्त व्हावी यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. अनुच्छेद १७ नुसार भारतीय समाजामध्ये असणारी अस्पृश्यता असंविधानिक मानली गेली आहे. अनुच्छेद १८ मध्ये शैक्षणिक व लष्करी पदवी व्यतिरिक्त कोणतीही विशेष पदवी धारण करता येत नाही. अशा प्रकारे विविध अनुच्छेदाच्या माध्यमातून समानतेचे मूल्य रुजविण्याचे प्रयत्न संविधानामध्ये करण्यात आले आहेत.

**क) बंधुता :** भारत एक विविधतेने समृद्ध देश आहे. विविध जाती धर्मातील, अनेक भाषा बोलणारे लोक भारतामध्ये राहतात. संविधानाच्या अनुच्छेद ५१ अ मध्ये प्रत्येक नागरिकाने सलोखा व बंधुता प्रस्थापित करणे हे मुलभूत कर्तव्य निश्चित करण्यात आले आहे. भारताच्या संविधानामध्ये धर्मनिर्पेक्षतेचे तत्व मान्य करण्यात आले आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाला त्याच्या सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्याचे स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले आहे. बंधुता हे मूल्य स्वातंत्र्य आणि समतेच्या मूल्याला पूरक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते,समाजामध्ये बंधुता नसेल तर स्वातंत्र्य आणि समता सुद्धा प्रस्थापित होऊ शकत नाही. बंधुता हे लोकशाही मूल्य सामाजिक सौहार्द प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक आहे.

**ड) न्याय :** न्याय हा भारतीय संविधानाचा गाभा आहे. कोणतेही तत्वज्ञान न्यायाच्या प्रस्थापनेशिवाय टिकू शकत नाही. भारतीय संविधानाने न्याय हे लोकशाही मूल्य म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही व्यवस्थेमध्ये न्याय या मूल्याची अवहेलना होत असेल तर ती व्यवस्था टिकून राहणे अशक्य असते. न्यायाच्या प्रस्थापनेसाठी भारतीय संविधानातील अनुच्छेद ११४ नुसार सर्वोच न्यायालय व अनुच्छेद २२४ अनुसार उच्च न्यायालय यांची स्थापना केली आहे. भारतीय भारतीय संविधानाने एकेरी न्यायव्यवस्था प्रस्थपित केली आहे. ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालय हे अंतिम न्यायालय असते. भारतातील कोणताही नागरिक कसल्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय या न्यायालयांच्या माध्यमातून न्याय मिळवू शकतो. स्थिर व मजबूत समाज निर्माण करावयाचे असल्यास त्या समाजामध्ये न्याय प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक असते त्याच दृष्टीने भारतीय संविधानाने न्याय हे लोकशाही मूल्य प्रस्थापित केल्याचे दिसते.

**४. सारांश :**

भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेला देश आहे. या व्यवस्थेचे जगभरात महत्त्व आहे. भारतीय लोकशाही व्यवस्था ही लोकशाही मूल्यांचे जतन आणि संवर्धन करते. इथे सार्वत्रिक निवडणुका, प्रौढ मतदान, मूलभूत अधिकार, कायद्याचे राज्य आणि कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ आणि न्यायमंडळ यांचे स्वातंत्र्य अबाधित आहे. आपली लोकशाही व्यवस्था सामाजिक न्याय आणि समानतेला प्रोत्साहन देते. इथे सर्व नागरिकांना समान अधिकार आणि संधी यांची तरतूद आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेने देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जगभरातील विचारवंतांच्या मते भारतीय लोकशाही व्यवस्था ही जगासमोर आदर्श निर्माण करणारी आहे . भारताच्या लोकशाहीचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीपासून सुरू होतो. प्राचीन भारतात अनेक लोकशाही तत्त्वे आणि संस्था अस्तित्वात होत्या. लोकशाहीच्या या प्राचीन परंपरेमुळेच भारताला लोकशाहीची जननी मानले जाते. भारतीय लोकशाहीला मोठा इतिहास असल्याचे आपल्याला दिसते. सिंधू संस्कृती, वैदिक काळखंड, महाजनपदांचा कालखंड या प्राचीन काळापासून ते २० व्या शतकातील भारतीय स्वातंत्र लढ्यापर्यंत भारतीय लोकशाहीच्या उत्क्रांतीला व विकासाला मोठी पार्श्वभूमी आहे.

**५. पारिभाषिक शब्द**

**१) लोकशाही –** लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य

**२) सभा व समिती –** प्राचीन काळातील प्रातिनिधिक कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ

**३) अनुभव मंटप –** विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी महात्मा बसवण्णा यांनी स्थापन केलेले विचारपीठ.

**४) दुहेरी शासन व्यवस्था –** अशी व्यवस्था जिथे प्रशासनात दोन संस्था अस्तित्वात असतात.

**५) द्विगृही कायदेमंडळ –** दोन सभागृह असणारे कायदेमंडळ

**६) प्रजासत्ताक –** ज्या राज्याचा प्रमुख लोकांकडून निवडला जातो ते राज्य प्रजासत्ताक राज्य असते.

**७) सार्वभौम –** कोणत्याही परकीय सत्तेचे नियंत्रण नसणे.

**८) इस्ट इंडिया कंपनी –** भारतात व्यापारासाठी आलेली ब्रिटीश कंपनी

**९) गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय –** भारत सरकारचे ब्रिटीशकालीन प्रशासकीय प्रमुख

**१०) संविधान सभा –** राज्यघटना निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आलेली समिती.

**६. स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे**

**१) लोकशाही हा शब्द कोणत्या इंग्रजी शब्दांपासून तयार झाला आहे?**

अ) डेमोस व क्रेटोस ब) डेमोन व क्रेटोन

क) डेमो व कर्सी ड) डेमीन व कर्सीन

**२) लोकशाहीची खालीलपैकी व्याख्या कोणती आहे?**

अ) राजाने लोकांसाठी चालविलेले राज्य

ब) लोकांनी राजासाठी चालविलेले राज्य

क) राजाने राजासाठी चालविलेले राज्य

ड) लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य

**३) अनुभव मंटपाची स्थापना कोणी केली?**

अ) संत तुकाराम ब ) महात्मा बसवण्णा

क) गौतम बुद्ध ड) गुरु नानक

**४) कोणत्या कायद्याने भारतामध्ये पहिल्यांदा मर्यादित मताधिकार देण्यात आला?**

अ) सनद कायदा १८९२ ब) भारत परिषद कायदा १९०९

क) भारत सरकार कायदा १९१९ ड) भारत सरकार कायदा १९३५

**५) भारतीय लोकशाही व्यवस्थेचे खालीलपैकी कोणते वैशिष्ट्ये आहे?**

अ) संसदीय लोकशाही ब ) संघराज्यात्मक लोकशाही

क) धर्मनिरपेक्ष ड ) वरील सर्व

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) अ) डेमोस व क्रेटोस

२) ड) लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य

३) ब ) महात्मा बसवण्णा

४) क) भारत सरकार कायदा १९१९

५) ड ) वरील सर्व

## ७. सरावासाठी स्वाध्याय

### अ) टिपा लिहा

१) प्राचीन काळातील भारतीय लोकशाही

२) भारतीय लोकशाही वरील विविध प्रभाव

३) ब्रिटीश कायदे आणि भारतीय लोकशाही

४) भारतीय लोकशाहीची रचना

### ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१) लोकशाही म्हणजे काय ? भारतीय लोकशाहीचा इतिहास सविस्तर स्पष्ट करा?

२) भारतीय लोकशाहीची रचना व वैशिष्ठ्ये सविस्तर स्पष्ट करा ?

३) भारतीय लोकशाहीच्या विकासामध्ये ब्रिटीश काळातील कायद्यांचे महत्व स्पष्ट करा ?

## ८. अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ


१) यादव योगेंद्र,पळशीकर सुहास,डिसुझा पीटर,(२०१०) लोकशाही जिंदाबाद - भारतीय उपखंडातील वैशिष्टेपूर्ण लोकशाहीचा शोध, अनु - सोनवणे मनोहर , समकालीन प्रकाशन पुणे.

२) व्होरा राजेंद्र , पळशीकर सुहास (दु.आ.२०२४), भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार , डायमंड पब्लिकेश, पुणे.

३) भोळे.भा.ल. (२०२१), भारतातील गणराज्याचे शासन आणि राजकारण,पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर.

४) Khilnani Sunil (2004), "The Idea of India", Penguine Books, New Delhi.

५) Kashyap Subhash (Re.2017) Our Political Sysyem, NBT,New Delhi,

६) Nehru Jawaharlal, (2004), Discovery of India, Penguine Books, New Delhi.

७) Laxmikant M. (Re.2024), Indian Polity, McGraw Hill, Chennai.

८) Altekar -.S.,(1958), State Government in India, Motilal,Delhi.


❑❑❑

# घटक २
# आधुनिक भारतीय लोकशाही

**१.० उद्दिष्ट्ये**
**२.० प्रस्तावना**
**३.० विषय विवेचन**
**४.० सारांश**
**५.० पारिभाषिक शब्द**
**६.० स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे**
**७.० स्वाध्याय**
**८.० संदर्भसूची**

**१.० उद्दिष्ट्ये :**

१) प्रस्तुत घटकामध्ये लोकशाही व्यवस्थेविषयी सविस्तर माहिती जाणून घेणे.
२) प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेचे अर्थ व स्वरूप समजून घेणे.
३) संसदीय लोकशाहीची वैशिष्ट्ये समजून घेणे.
४) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने जाणून घेणे.

**२.० प्रस्तावना :**

लोकशाहीची संकल्पना राजकीय सिद्धांताच्या केंद्रस्थानी असलेली संकल्पना आहे. लोकशाहीची संकल्पना दोन हजार वर्षापूर्वीपासून अस्तित्वात आहे. प्राचीन ग्रीक राजकीय विचारांमध्ये लोकशाहीचा उल्लेख सापडतो. लोकशाही संकल्पनेच्या विकासामध्ये प्राचीन रोमन साम्राज्याचे योगदान मोठे आहे. प्रसिद्ध ग्रीक विचारवंत प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या लिखानामधून लोकशाहीचे उल्लेख सापडतात. प्लेटोच्या मते 'लोकशाही म्हणजे शासित लोकांचे राज्य'. लोकशाही संकल्पनेत एकाच वेळी राजकीय, सामाजिक तत्वप्रणाली, संस्था, व्यवस्था, व्यवहार, लोकांची मनोवृत्ती इत्यादी विविध गोष्टी आढळून येतात. आज लोकशाही जगात सर्वात लोकप्रिय अशी राजकीय व्यवस्था आहे. आंतरराष्ट्रीय समूदायातील अर्ध्याहून अधिक राष्ट्रांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. राज्यशास्त्राच्या शब्दकोशात लोकशाही हा शब्द जरी हजारो वर्षापासून असला तरी त्याचा खऱ्या अर्थाने वापर विसाव्या शतकात सुरू झाला. या शतकात स्वतंत्र झालेल्या बहूसंख्य राष्ट्रांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा अंगीकार केला. या शतकातच अनेक देशांचा प्रवास हा लोकशाहीकडे झालेला दिसून येतो. विसाव्या शतकातील दोन महायुद्धे ही लोकशाही मुल्यांच्या संरक्षणासाठी लढली गेली. पहिले महायुद्ध वसाहतवाद विरूद्ध लोकशाही मुल्ये अशा स्वरूपाचे होते तर दुसरे महायुद्ध हुकुमशाही विरुद्ध लोकशाही अशा स्वरूपाचे होते. दोन्ही महायुद्धामध्ये लोकशाही मुल्यांचाच विजय झाला. लोकशाही हे

लोकसंमतीने चालणारे शासन आहे. आधुनिक काळात ही संमती सार्वत्रिक व प्रौढ मतदान हक्कानुसार होणाऱ्या निवडणूकीच्या मार्गाने होते. मतदानाचा विस्तृत होत गेलेला हक्क लोकशाहीचा पाया विस्तृत करत असतो. छोट्या ग्रीक नगरराज्यात प्रचलीत असलेली प्रत्यक्ष लोकशाही हे लोकसहभागाचे प्रत्यक्षीकरण होते. आजच्या काळातील लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग स्थिर व व्यापक राहण्यासाठी समाजपातळीवर मुल्यांबाबत सहमती, सामाजिक व्यवहाराबाबत, नियमांबाबत सहमती आणि विविध सामाजिक निर्णयाबाबत सहमती यांची आवश्यकता असते. बहुमताने अल्पमताचे म्हणने ऐकून घेण्याची आणि त्यांतील योग्य मताचे सहमतीमध्ये रूपांतर करण्याची तयारी आणि सहमती आवश्यक असेल तर मतविरोधाची सर्व मान्य पध्दती यावर लोकशाहीचे यश अवलंबून असते. बहुमतांचे शासन आणि अल्पमतांचे हक्क यांत समतोल साधणे यामुळे लोकशाही गतिमान राहते. राजकीय दृष्टीने संमती, सहमती व सहकार्य यावर लोकशाही शासनाचा भर असला तरी शासन चालविण्यापेक्षा त्यांच्या दिशेला लोकानुवर्ती व प्रातिनिधिक वळण देणे त्यामागे अभिप्रेत आहे. समाज जीवनातील विशिष्ट मुल्ये आणि आचरण पद्धती जाणीवपूर्वक जपण्याचा आग्रह लोकशाही व्यवस्थेत धरला जातो.

## ३.० विषय विवेचन

### ३.१ लोकशाहीची व्याख्या :

**१) लॉर्ड वाइस:** राज्याची सत्ता समाजातील सर्व लोकांच्या हाती सामूदायिक स्वरूपात देण्यात आलेला शासन प्रकार म्हणजे लोकशाही होय.

**२) अब्राहम लिंकन :** लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकडून चालविले गेलेले शासन होय.

**३) सिली :** लोकशाही हा प्रत्येकाचा सहभाग असणारा शासन प्रकार आहे.

**४) मेकफर्सन :** लोकशाही म्हणजे शासन निवडण्याचा आणि त्याद्वारे कायदे बनविण्याचा राजकीय निर्णय घेण्याचा प्रकार आहे.

**५) लिपसेट :** लोकशाही म्हणजे अशी राजकीय व्यवस्था की ज्यामध्ये लोकांना आपले शासनकर्ते बदलण्याची नियमित घटनात्मक संधी मिळते आणि अशी सामाजिक व्यवस्था की ज्यामध्ये वहुसंख्य लोकांना निवडणूकीच्या माध्यमातून महत्वपूर्ण धोरणांना, निर्णयांना प्रभावित करण्याची संधी मिळते.

**६) सरतोरी :** लोकशाही शासनव्यवस्था म्हणजे अशी शासन व्यवस्था की जी शासनकर्त्यांना जबाबदार आणि उत्तरदायी बनविते. या व्यवस्थेची परिणामकारकता राजकीय नेतृत्वाच्या कौशल्य गुणांवर आधारलेली असते.

**७) हेरोडोटस :** ज्या समाजात समान हक्क असतात व जेथे राज्यकर्ते आपल्या कृत्यांना जबाबदार असतात तो समाज म्हणजे लोकशाही समाज होय.

**८) जॉन स्टूअर्ट मिल :** लोकशाही ही शासन प्रणालीचा असा प्रकार आहे की ज्यात सर्व लोक किंवा त्यांच्यापैकी त्यांनीच निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत शासकीय सत्तेचा वापर करतात.

### ३.२ लोकशाहीचे विविध पैलू :

विसाव्या शतकात लोकशाहीच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अशा पैलूंचा विकास झाला. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक लोकशाही ही लोकशाहीची विविध रूपे आहेत.

**अ) राजकीय लोकशाही :**

लोकशाहीमध्ये राजकीय लोकशाही हा शासनाचा प्रकार आहे. या प्रकारामध्ये लोक स्वतः प्रत्यक्षरित्या किंवा प्रतिनिधीद्वारे शासन सत्तेचा उपयोग करतात. राजकीय लोकशाहीमध्ये प्रौढ नागरिकाला भाषा, जात, धर्म, वंश, संपत्ती, सामाजिक दर्जा, प्रदेश या आधारावर कोणताही भेदभाव न करता मतदानाचा समान अधिकार दिला आहे. प्रौढ नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात नाही. राजकीय लोकशाहीमध्ये निवडणूकीत उभे राहण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. वैधानिक मार्गाने शासन बदलण्याचा अधिकार लोकांना असतो. राजकीय पक्षाची निर्मिती, मताधिकार राजकीय लोकशाहीचा मुख्य उद्देश आहे. काही देशात राजकीय लोकशाहीचा अभाव दिसून येतो.

**ब) सामाजिक लोकशाही**

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वावर सामाजिक लोकशाही मधील समाजव्यवस्था आधारलेली असते. जाती, धर्म, वंश, भाषा, श्रेष्ठ, कनिष्ठ, गरीव, श्रीमंत अशा प्रकारचा भेदभाव नसतो. प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेला महत्व असावे असे अपेक्षीत असते. काही क्षेत्रामध्ये राजकीय लोकशाही प्रस्थापित होते पण सामाजिक लोकशाहीचा अभाव दिसून येतो. उदा. अमेरीकेत राजकीय लोकशाही उच्च प्रतिची आहे. पण अजूनही तेथील कृष्णवर्णीय लोकांना सामाजिक जीवनात सन्मानाचे आणि इतरांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त झालेले नाही. तसेच भारतात देखील राजकीय लोकशाही आहे, पण व्यवहारात सामाजिक लोकशाही अजून पर्यंत रूजलेली नाही ही वास्तविकता नाकारता येत नाही. सामाजिक आणि राजकीय लोकशाही परस्पर पूरक आहे. यासाठी दोन्हीचे अस्तित्व असणे आवश्यक आहे.

**क) आर्थिक लोकशाही**

आर्थिक लोकशाही हा राजकीय लोकशाहीचा पाया आहे. लोकशाही समाजवादात राजकीय आणि आर्थिक लोकशाहीला सारखेच महत्व देण्यात येते. राजकीय लोकशाही प्रस्थापित झाल्यानंतर आर्थिक लोकशाहीच्या स्थापनेवर भर दिला जातो. प्रत्येकाला अर्थार्जन करण्याची आणि आपला स्वतःचा विकास करण्याची समान संधी प्राप्त होणे म्हणजे आर्थिक लोकशाही होय. आर्थिक लोकशाही जो पर्यंत प्रस्थापित होत नाही तो पर्यंत राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित होऊ शकत नाही.

### ३.३ लोकशाहीचे प्रकार :

**अ) प्रत्यक्ष लोकशाही :-**

लोकशाहीच्या कारभारात लोकांचा सहभाग कोणत्या रीतीने होतो यावरून लोकशाहीचे प्रत्यक्ष लोकशाही व अप्रत्यक्ष लोकशाही असे प्रकार पाडले जातात. प्रत्यक्ष लोकशाहीचे आदर्श स्वरूप ग्रीक नगर राज्यांमध्येच अस्तित्वात होते. त्या नगर राज्यांचा कारभार करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी त्या-त्या नगरातील सर्व नागरिक एकत्र होत असत आणि निर्णय घेत असत. प्रत्यक्ष लोकशाही ही आधुनिक काळात स्वित्झर्लंड देशातच काही प्रमाणात आढळते. तिथल्या नागरिकांना कायद्याचा मसुदा मांडण्याबाबत पुढाकार घेता येतो, आपल्या प्रतिनिधींना

परत बोलावण्याचा हक्क असतो आणि तिथले राज्यकर्ते काही प्रस्ताव निर्णय घेण्यापूर्वी नागरिकांच्या सार्वमताला टाकू शकतात एवढयाच संदर्भात तिथे प्रत्यक्ष लोकशाहीचे अवशेष आहेत.

**ब) प्रातिनिधीक लोकशाही/ अप्रत्यक्ष लोकशाही:**

अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाहीतील नागरिक निवडणूकींव्दारे आपले प्रतिनिधी निवडतात आणि ते प्रतिनिधी लोकांच्यावतीने राज्यकारभार करतात. प्रातिनिधीक लोकशाहीचे अध्यक्षीय व संसदीय असे दोन प्रकार आढळतात. त्यातील पहिल्या प्रकारात म्हणजेच अध्यक्षीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ एकमेकांपासून स्वतंत्र असतात. अशा प्रकारची व्यवस्था अमेरिकेत आढळते तर दुसऱ्या प्रकारच्या म्हणजेच संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ विधिमंडळात उत्तरदायी असते आणि त्याचा विश्वास असे पर्यंतच सत्तेवर राहू शकते. ही व्यवस्था भारत आणि इंग्लंड या देशात आढळते. नागरिक सार्वत्रिक निवडणूकांच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडतात. हे प्रतिनिधी नागरिकांच्या वतीने शासन कारभार चालवितात ते जनतेला उत्तरदायी आणि जवाबदार असतात. या प्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयांना ठरविलेल्या धोरणांना जनतेची अधिमान्यता असते. जनतेला निवडणूकीच्या माध्यमातून शासनकर्त्यांना बदलण्याचा अधिकार असतो. थोडक्यात प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये जनता जरी प्रत्यक्ष शासन कारभारात सहभागी होत नसली तरी सत्तेची खरी सुत्रे जनतेच्या हातात असतात.

भारतीय लोकशाही व्यवस्था ही प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था आहे. भारतामध्ये संसद हे सर्वोच कायदे मंडळ आहे आणि संसदेमध्ये कायादा निर्मितीचे कार्य हे संसद सदस्य करत असतात. भारतीय संसदेच्या सदस्यांना खासदार असे संबोधले जाते. भारताची संसद ही द्विगृही आहे. राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह व लोकसभा हे कनिष्ठ सभागृह मानले जाते. लोकसभेमध्ये प्रत्यक्ष प्रौढ मतदारांकडून प्रतिनिधी निवडले जातात तर राज्यसभेमध्ये अप्रत्यक्षरित्या प्रतिनिधी निवडले जातात. राज्यसभा हे सभागृह भारतातातील घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करते. आधुनिक काळात प्रत्यक्ष लोकशाही व्यवस्था राबविणे हे वास्तविक दृष्ट्या कठीण आहे.भारतासारख्या देशामध्ये जिथे १४० कोटींहून अधिक लोक राहतात तिथे प्रत्यक्ष लोकशाही राबविणे शक्य नाही. त्यामुळे अप्रत्यक्ष म्हणजेच प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था निर्माण करून प्रतिनिधींच्या माध्यमातून लोकशाही व्यवस्था राबविली जाते.

जगातील जवळपास सर्वच लोकशाही देशांमध्ये प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेचे प्रारूप स्विकारण्यात आले आहेत.त्यामध्ये काही उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत :

१) युनायटेड किंग्डम २) जर्मनी ३) यु.एस.ए. ४) दक्षिण आफ्रिका ५) फ्रान्स इ.

**प्रातिनिधिक लोकशाह व्यवस्थेच्या मर्यादा :**

प्रातिनिधिक लोकशाही मध्ये लोकांच्या प्रत्यक्ष सहभागाला मर्यादा येतात अशी टीकाही प्रातिनिधिक लोकशाहीच्या प्रारुपावर केली जाते परंतु वास्तविकदृष्ट्या लोकशाही व्यवस्था राबवायची असेल तर प्रातिनिधिक स्वरूपातील लोकशाही व्यवस्थाच दीर्घ काळ स्थिर राजकीय व्यवस्था देऊ शकते.प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये सर्वसमावेशक प्रतिनिधित्व मिळत नाही अशी ही टीका केली जाते. समाजातील वंचित घटक, मागासवर्ग, स्त्रिया, अल्पसंख्यांक या समुदायांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळत नाही म्हणून भारतीय संविधानाच्या माध्यामातून अनुसूचित जाती व जमाती साठी भारतीय राज्यघटनेमध्ये विशेष आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर २०२३ साली स्त्रियांनाही न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे म्हणून भारतीय संसदेने महिला आरक्षण कायदा मंजूर करून

संसद व राज्यांच्या विधीमंडळामध्ये ३३ टक्के जागांवर स्त्रियांना आरक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेच्या मर्यादा जरी असल्या तरी स्थिर व दीर्घकालीन राजकीय व्यवस्था म्हणून प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेचे विशेष महत्व आहे.

**३.४ लोकशाहीचे प्रकार : अध्यक्षीय व संसदीय लोकशाही :**

**अ) अध्यक्षीय लोकशाही :**

अध्यक्षीय लोकशाही हा सरकारचा एक प्रकार आहे. ज्यामध्ये सरकारचे प्रमुख अध्यक्षपदासह एक कार्यकारी मंडळाचे ही नेतृत्व करतात. अध्यक्षीय प्रणालीमध्ये, सरकारचा प्रमुख लोकांद्वारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निवडला जातो आणि तो विधीमंडळास जबाबदार नसतो आणि विशेष कारणांशिवाय कायदेमंडळ अध्यक्षांना पदच्युत करू शकत नाही.

अध्यक्षीय प्रणाली ही मुख्यत: अमेरिकेतील सरकारचे प्रमुख स्वरूप आहे. अध्यक्षीय लोकशाही मध्य आणि दक्षिण- पश्चिम आफ्रिका आणि मध्य आशियामध्ये देखील प्रचलित आहे. याउलट, युरोपमध्ये फारच कमी अध्यक्षीय लोकशाही व्यवस्था आहेत, ज्यामध्ये बेलारूस, सायप्रस आणि तुर्की ही काही उदाहरणे आहेत.

**अध्यक्षीय लोकशाहीच्या मर्यादा :**

१) राष्ट्रपती हा एकमेव राज्य आणि सरकारचा प्रमुख असतो ज्यामुळे तो निरंकुश होण्याचा धोका वाढतो. संपूर्ण देशावर त्यांचे पूर्ण नियंत्रण आणि सत्ता आहे आणि त्यांचा कार्यकाळही निश्चित आहे.

२) अध्यक्षीय सरकारच्या प्रारूपावर अनेकदा कठोर टीका केली जाते. हे ताठर स्वरूपाचे असल्याचे म्हटले जाते.

३) कार्यकारी आणि कायदेमंडळाच्या दोन शाखांमधील अधिकारांचे पृथक्करण झाल्यामुळे, दोघांमध्ये सामंजस्याचा अभाव होऊ शकतो यामुळे यंत्रणेची कार्यक्षमता कमी होते.

**ब) संसदीय लोकशाही :**

निर्वाचित लोकप्रतिनिधींच्या सभागृहाद्वारे (संसद) चालविलेली एक शासनपद्धती म्हणजे संसदीय लोकशाही शासनपद्धती होय. हा शासनपद्धतीचा आकृतिबंध जगातील सर्व संसदीय लोकशाही शासनपद्धतीत सर्वमान्य झाला आहे. बहुसंख्याकांचे शासन या संकल्पनेशी ती निगडित आहे. ही शासनव्यवस्था असणारी राज्यव्यवस्था संसदीय लोकशाही म्हणून ओळखली जाते. या लोकशाही पद्धतीत राष्ट्राच्या विधिमंडळाला-संसदेला-महत्त्वपूर्ण स्थान आहे. कार्यकारी मंडळाचे अस्तित्व संसदेतील लोकप्रतिनिधींच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. परंतु काही वेळा राजकीय परिस्थितीचा परिणाम म्हणून कार्यकारी मंडळाचा वास्तविक प्रमुख - पंतप्रधान-यांच्या शिफारशीनुसार विधिमंडळ बरखास्त करून नव्या निवडणुकांच्या माध्यमातून नवीन विधिमंडळाची स्थापना करू शकतो. अन्यथा संबंधित राज्याच्या संविधानाने निर्धारित केलेला कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर पुन्हा नवीन निवडणुका घेतल्या जातात आणि नवीन शासन अधिकाररूढ होते. राज्यप्रमुख आणि शासनप्रमुख या दोन पदांचे स्वतंत्र अस्तित्व, राज्यप्रमुखाला नाममात्र अधिकार आणि शासनप्रमुखाला वास्तविक सत्ता, ही या पद्धतीची आणखी काही प्रमुख वैशिष्ट्ये म्हणून नमूद केली जातात.

इंग्लंडशिवाय जगातील खालील देशांमध्ये संसदीय लोकशाही शासन-व्यवस्था अस्तित्वात आहे :

(१) आर्मेनिया, (२) ऑस्ट्रेलिया, (३) ऑस्ट्रिया, (४) बेल्जियम, (५) कॅनडा, (६) झेक प्रजासत्ताक,

(७) डेन्मार्क, (८) एस्टोनिया, (९) फिनलंड, (१०) जॉर्जिया, (११) जर्मनी, (१२) गीस, (१३) हंगेरी, (१४) भारत (१५) आयर्लंड प्रजासत्ताक

### ३.५ भारतीय संसदीय लोकशाही पद्धतीची वैशिष्ट्ये:

**अ) जबाबदार शासनपद्धती :**

संसदीय लोकशाही हा एक जबाबदार शासनप्रकार मानला जातो. पंतप्रधान लोकप्रतिनिधींच्या सभागृहाला उत्तरदायी असतो. आपल्या प्रतिनिधींमार्फत राष्ट्राच्या कार्यकारिणीवर जनता अंकुश ठेवू शकते.

**ब) सर्वसमावेशक प्रतिनिधित्व :**

वंश, धर्म, भाषा, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सांस्कृतिक वारसा यांबाबतीत विविधता असणाऱ्या भारतासारख्या देशात संसदीय लोकशाहीमुळे विविध जनसमुदायांना राजकारणात प्रतिनिधित्व देणे शक्य झालेले आहे. त्यामुळे विविधतापूर्ण समाजांना ही पद्धत उपयुक्त ठरली आहे. योग्य प्रतिनिधित्वाच्या संधीमुळे राष्ट्रीय एकात्मता साधण्यासही संसदीय लोकशाही उपयुक्त ठरली आहे.

**क) अंतिम निर्णय घेण्याची सत्ता जनतेकडे :**

भारतीय लोकशाही व्यवस्थेचे हे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, Democracy is the rule of the people for the people by the people. याचा अर्थ जनतेला केंद्रस्थानी ठेऊन कार्य करणारी ही व्यवस्था आहे. राज्यातील सर्वोच्य सत्ता ही जनतेच्या हातात असल्यामुळे अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा जनतेकडेच असतो. लोकशाही जनता ही आपल्या प्रतिनिधिच्या माध्यमातून शासन चालवत असते. हे प्रतिनिधी जनतेकडून निवडले गेले असल्यामुळे त्यांनी घेतलेले निर्णय हे जनतेचे निर्णय असतात.

**ड) मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूका**

मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूका हे भारतीय संसदीय लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्टय आहे. मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूकांशिवाय लोकशाहीचे अस्तित्व शक्य नाही. या निवडणूकांद्वारे जनता आपले प्रतिनिधी शासन कारभारासाठी निवडते. लोकसंख्या वाढल्यामूळे प्रत्यक्ष लोकशाही आज शक्य नाही. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिक शासन कारभारात सहभाग घेतो पण ते आज शक्य नाही परिणामी जनता अप्रत्यक्षपणे आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून शासन चालविते. हा अप्रत्यक्ष लोकशाहीचा प्रकार लोकशाहीमध्ये केवळ निवडणूका असून पुरेसे नाही. जनतेपुढे विविध राजकीय पर्याय उपलब्ध असणे गरजेचे आहे. जनता या पर्यायामधून निवडणूकीच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा पर्याय निवडते.निवडणूकांमुळे जनतेला केवळ आपले प्रतिनिधी निवडण्याचीच संधी मिळत नाही तर अस्तित्वात असलेले शासन बदलण्याची संधीही मिळते.

**इ) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत मतदानाचा अधिकार हा समाजातील विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित होता. महिलांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले होते. परंतु भारतात वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या भारतीय नागरिकाला कोणत्याही भेदभावाशिवाय, पूर्व अटीशिवाय मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे.

**फ) व्यापक राजकीय सहभाग :**

संसदीय लोकशाहीमध्ये जनतेचा राजकीय सहभाग हा व्यापक स्वरूपाचा असतो. हा राजकीय सहभाग विशिष्ट

अंतराने होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकांमधून प्रतिबिंबित होतो. प्रौढ मताधिकारांमूळे सर्वच नागरिक राजकीय प्रक्रियेत सहभागी होत असतात. नागरिकांच्या व्यापक राजकीय सहभागावरच लोकशाहीची यशस्विता अवलंबून असते.

**ज) सत्तेचे विकेंद्रीकरण:**

संसदीय लोकशाही शासनात सत्तेचे विकेंद्रीकरण महत्वाचे असते. लोकशाहीत कोणत्याही घटकाकडून सत्तेचा गैरवापर होऊ नये यासाठी सत्ता विभाजन आवश्यक असते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ, यांच्यात अधिकारांची विभागणी केलेली असते. त्याचबरोबर केंद्रीय पातळीपासूनच ते ग्रामपातळीपर्यंत सत्तेच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करून सर्वसामान्य नागरिकांनाही राजकीय प्रकियेत सहभागी होण्याची संधी दिली जाते. भारतीय लोकशाही व्यवस्थेत सत्तेचे असे निश्चित केंद्रीकरण करण्यात आले आहे.

**ह) स्पर्धात्मकता :**

स्पर्धात्मकता हे भारतीय लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. विविध राजकीय पक्ष सत्ताप्राप्तीसाठी निवडणूकांच्या रिंगणात असतात निवडणूकांच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करण्यासाठी त्यांच्यात चढाओढ असते. या बहूलतेमुळे नागरिकांनाही पर्याय उपलब्ध होतात. भारतात बहुपक्ष पद्धतीमुळे ही स्पर्धात्मकता वाढली आहे.

**य) घटनात्मक कायदा आणि जनअधिकारांना केंद्रस्थान :**

संसदीय लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे घटनात्मक कायदा आणि जनअधिकारांना असलेले केंद्रस्थान. निवडणूकीद्वारे निवडून आलेल्या प्रत्येक शासनाला घटनात्मक कायदयाच्या चौकटीत राज्यकारभार करावा लागतो.घटनात्मक कायदा हा राज्यातील सर्वोच्च कायदा असून तो सर्वांसाठी समान असतो. घटनात्मक कायदयाने जनतेला काही नागरी आणि राजकीय अधिकार बहाल केलेले असतात. या अधिकारांचे रक्षण करणे शासनाचे कर्तव्य आहे. शासनाकडून या अधिकारांचे उल्लंघन झाल्यास व्यक्तीला न्यायपालिकेकडे दाद मागण्याचा अधिकार आहे.

## ३.६ भारतीय लोकशाही व्यवस्थेचे गुण :

**१) समता, स्वातंत्र्य व बंधूता या तत्वांना पोषक :**

लोकशाही हा एकमेव शासन प्रकार असा आहे की जिथे प्रत्येक व्यक्तीला आपले स्वतःचे असे मोल असते आणि प्रत्येक व्यक्तीच्या अंगी विकासाच्या अमर्याद सुप्त शक्यता दडलेल्या असतात असे गृहित धरले जाते. प्रत्येकाला स्वतःच्या सुप्त गुणांचा व मानवी व्यक्तीमत्वाचा जास्तीत जास्त विकास करण्याची संधी पुरविली जाते. लोकशाही राज्यव्यवस्थेत सर्वाना समान वर्तणूक मिळते समान हक्क व स्वातंत्र्ये दिली जातात आणि सर्वांचे परस्परांशी असलेले संबंध बंधुभावाचे राहतील असे प्रयत्न केले जातात.

**२) सर्वाच्या हितसंबंधांचे संरक्षण :**

लोकशाहीमध्ये समाजातील सर्व लोकांच्या हितसंबंधांचे संरक्षण होते. लोकशाहीत सर्व जनतेचे प्रतिनिधित्व करणारे शासन असल्यामूळे जनतेचे प्रश्न शासनाला माहित असतात आणि ते सोडविण्यासाठी प्रयत्न केला जातो.

**३) कल्याणकारी भूमिका**

आधुनिक काळात लोकशाही शासन व्यवस्थांनी कल्याणकारी भूमिका स्वीकारली असून या शासन

व्यवस्था सामाजिक प्रगतीसाठी वचनबद्ध आहेत. जनतेचे अधिकाअधिक कल्याण करणे हे या शासनाचे उद्दिष्ट असते त्यानूसार विकास योजना राबविल्या जातात.

**४) लोकमताला प्राधान्य :**

लोकशाही ही लोकमत किंवा जनमताला प्राधान्य देणारी शासन पद्धती आहे. लोकशाहीत शासन हे लोकमताचे प्रतिनिधित्व करणारे असते. कोणताही निर्णय घेताना किंवा धोरण ठरविताना लोकमताचा विचार केला जातो.

**५) विकेंद्रीकरण :**

लोकशाही शासन व्यवस्था ही विकेंद्रीकरणाच्या तत्वावर आधारलेली आहे. या पद्धतीत सत्ता ही विविध पातळ्यांवर आणि विविध घटकांमध्ये विभागली जाते. सत्ता विभागणीमूळे परस्पर समतोल आणि नियंत्रण साधले जाते. कोणताही निर्णय परस्पर विचार चर्चेतून घेतला जातो. लोकशाही विकेंद्रीकरणामूळे निर्णय निर्मिती प्रक्रियेत अधिकाअधिक लोकांना समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न होतो.

**६) जनशक्ती श्रेष्ठ :**

लोकशाहीत सत्तेची अंतिम सुत्रे ही जनतेच्या हातात असतात. जनता आपले प्रतिनिधी निवडून देते. हे प्रतिनिधी आपल्या कार्यासाठी जनतेला जबाबदार असतात. या पद्धतीत शासन निरंकुश बनण्याचा किंवा एकाधिकारशाहीपणे वागण्याचा प्रश्न उद्भवत नाही. राज्यकर्त्यांमध्ये जबाबदारीची जाणीव असते.

**७) राजकीय प्रशिक्षण :**

लोकशाही ही जनतेला राजकीय प्रशिक्षण देणारी त्यांना स्वयंशासनाची कला शिकविणारी प्रयोगशाळा आहे. या पद्धतीत सर्व जनतेला राजकीय प्रकियेत समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

**८) शांतता, सुरक्षिततेला प्राधान्य :**

लोकशाही शासन व्यवस्था शांतता आणि सुरक्षिततेच्या तत्वांना प्राधान्य देणारी आहे. या पद्धतीत सत्तांतराची प्रकियादेखील शांततेच्या आणि घटनात्मक पद्धतीने होते. जनता निवडणूकांच्या माध्यमातून आपल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करत सत्तांतर घडवून आणते. शांतता आणि सुरक्षितता व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी उपकारक ठरते.

**३.७ लोकशाहीच्या यशस्वीतेसाठीच्या बाबी :**

लोकशाही हा सर्वोत्तम शासन प्रकार असला तरी त्या आदर्श स्वरूपात आज तो जगात कुठेही अस्तित्वात आहे असे म्हणता येणार नाही. त्या आदर्शाकडे जाण्याचा प्रयत्न प्रत्येक लोकशाही देश आपापल्या परीने करतो असेच आपण म्हणू शकतो. लोकशाही यशस्वी होण्यासाठी ज्या काही पूर्वशर्ती असतात त्या विशिष्ट देशात किती प्रमाणात पूर्ण होतात यावर तो देश लोकशाहीच्या आदर्शाच्या किती जवळ जाऊ शकतो हे अवलंबून असते.

**१) आर्थिक व सामाजिक विषमता वाजवीपेक्षा जास्त नसावी :**

समाजातील गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी जर खूप असेल तर सामाजिकदृष्ट्या खालच्या स्तरावरील व गरीब लोकांना राजकीय हक्क निर्भयपणे वापरता येणार नाहीत. श्रीमंत वर्ग आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर राजकीय समानता पूर्णपणे निरर्थक बनवतील. तेव्हा लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सर्वात पहिली आवश्यक गोष्ट

असते ती म्हणजे समाजात सामाजिक व आर्थिक विषमता एवढी असू नये ज्यामुळे कनिष्ठ वर्गीयांना श्रीमंत वर्गाच्या मर्जीवर विसंबून रहावे लागेल.

**२) शिक्षणाच्या सोयी पुरेशा प्रमाणात असाव्यात :**

समाजात शिक्षणाचे प्रमाण किती आहे यावर लोकशाहीचे यश अवलंबून आहे प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण अशा सर्वच पातळ्यांवर समाजव्यापी व कार्यक्षम शिक्षणव्यवस्था ज्या देशात नसेल तिथल्या लोकशाहीचे भवितव्य संकटात आल्यावाचून राहणार नाही. लोकशिक्षण हा लोकशाहीसाठी महत्वाचा भाग असतो. त्यासाठी आवश्यक असलेली माध्यमे अस्तित्वात असणेही गरजेचे आहे.

**३) विवेकपूर्ण लोकमत अस्तित्वात असावे :**

लोकशाही हे लोकमतानुसार चालणारे राज्य असते. त्यामूळे शासनाला मार्गदर्शन करू शकेल अशा स्पष्ट व सुसंगत स्वरूपात समाजातील लोकमताचा कल सतत व्यक्त होत रहाणे गरजेचे असते. समाजात जो पर्यंत विषमता आहे तो पर्यंत तेथे लोकशाही शासन अस्तित्वात येण्याची शक्यता फारच थोडी असते.

**४) लोकांचे संघटन व नेतृत्व :**

लोकशाही यशस्वी होण्यासाठी लोकांचे योग्य प्रकारे संघटन असणे आवश्यक असते व त्यांना चांगले नेतृत्व लाभणे ही तितकेच गरजेचे असते. समान हितसंबंधांच्या आधारे लोक एकत्र येतात त्यातून दबावगट व राजकीय पक्षांचा उदय होतो. संघटनेच्या कार्याला दिशा लाभणे व त्यात सातत्य राखले जाणे आवश्यक असते. ते बहूतांश त्यांना लाभणाऱ्या नेतृत्वावर अवलंबून असते. बुद्धिमान, प्रामाणिक, निस्वार्थी नेते जनतेला योग्य मार्गदर्शन करू शकतात. संघटनेला शिस्त लावू शकतात. निर्णयकर्त्यापर्यंत जनतेचे म्हणणे प्रभावीपणे पोहचवू शकतात.

**५) लोकांचा लोकशाहीवर विश्वास असावा :**

लोकशाहीच्या तत्वावर आणि कार्यपद्धतींवर लोकांचा विश्वास नसेल तर किरकोळ निमित्तानेही ते असनदशीर व बेकायदा मार्गाकडे वळण्यास प्रवृत्त होतील हे स्पष्ट आहे. लोक वारंवार अशा मार्गाचा अवलंब करू लागले की राज्यकर्त्यांना दमनाचा मार्ग जवळ करायचे कारण मिळते आणि देशातील लोकशाहीचा अस्त जवळ आल्याचेच हे लक्षण असते.

**३.८ भारतीय लोकशाही समोरील आव्हाने :**

लोकशाही ही एक सजीवपणे चालणारी प्रक्रिया आहे . लोकशाहीचा स्वीकार केला म्हणजे लोकशाही अस्तित्त्वात राहील असे होत नाही. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते , जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. लोकशाहीला असणारे धोके वेळीच ओळखून त्यांचे लोकशाहीच्या मार्गानेच निराकरण करणे आवश्यक असते. प्रस्तुत घटकामध्ये आपण भारतीय लोकशाहीसमोर कोणती आव्हाने आहेत याचा प्रामुख्याने आढावा घेणार आहोत.

तत्पूर्वी जागतिक पातळीवर लोकशाही समोरील आव्हानांचा आपण थोडक्यात विचार करू. आज जगातला प्रत्येक देश आपण लोकशाहीवादी असल्याचे म्हणतो. परंतु प्रत्यक्षात मात्र लोकांचे हक्क आणि स्वातंत्र्य अबाधित ठेवणारी आणि जनकल्याणाला प्राधान्य देणारी लोकशाही फारच थोड्या देशांमध्ये आहे. लष्करी राजवटींचा मोठा धोका लोकशाहीसमोर आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर खऱ्या लोकशाहीचा प्रसार

होणे व प्रत्येक देशात तिचा अवलंब होणे  हे लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे. लोकशाही प्रसाराचे हे जागतिक पातळीवरील आव्हान आहे. ज्या देशांमध्ये लोकशाही रुजली आहे असे आपण म्हणतो तेथेही लोकशाहीचा वावर मर्यादितच आहे. अन्य देशांमध्येही लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणुका, शासनव्यवहार, न्यायालय इत्यादींचा बोध होतो. परंतु हे लोकशाहीचे केवळ राजकीय स्वरूप आहे. लोकशाही जर एक जीवनमार्ग व्हायचा असेल तर लोकशाही समाजाच्या विभिन्न क्षेत्रांत पोहचली पाहिजे. सर्व समाज घटकांचे सामीलीकरण, सामाजिक संस्थांना स्वायत्तता, नागरिकांचे सक्षमीकरण, मानवी मूल्यांचे जतन इत्यादी मार्ग त्यासाठी अवलंबावे लागतील.

खरी लोकशाही रुजवण्याचे हे कार्य पूर्ण होण्याची गरज आहे. लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे हे जगातल्या सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय, शांतता, विकास आणि मानवतावाद ही मूल्ये समाजाच्या सर्व स्तरांवर नेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक व्यापक सहमतीही पुन्हा लोकशाही मार्गानेच निर्माण करता येणे शक्य आहे. लोकशाही खोलवर नेण्यासाठी या सुधारणांची आवश्यकता आहे. उदारमतवादी लोकशाही संकल्पनेने औद्योगिक व विकसित अशा समाजात राजकीय व आर्थिक स्थैर्य निर्माण केलेले आहे. त्यामूळे विकसनशील व नवोदित देशांतही लोकशाही पद्धतीविषयी आकर्षण निर्माण झालेले आहे. आंतरराष्ट्रीय समाजात स्थान आणि प्रतिष्ठा मिळण्याच्या दृष्टीने  सामान्य लोकांबरोबर नवोदित राज्यांनाही लोकशाहीचे महत्व वाटू लागलेले आहे. लोकशाही अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने सत्तेचे विकेंद्रीकरण करणे व नागरिकांना  राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे.लोकशाहीच्या अंतर्भूत मर्यादा व सामाजिक राजकीय परिस्थितीतून काही आव्हाने निर्माण झाली आहेत.

**अ) जमातवाद :**

भारतीय लोकशाही मध्ये धार्मिक कट्टरता जमातवादाच्या रूपात एक मोठे आव्हान आहे. कोणत्याही लोकशाही मध्ये जमातवादी प्रवृत्ती ही लोकशाहीच्या विकासाला व कालांतराने अस्तित्वाला धोका निर्माण करणारी असते. जमातवादामध्ये 'आपले आणि परके' असा  'इतरीकरणाचा' भाव जन्माला येतो आणि लोकशाहीचा गाभा असणाऱ्या सर्वसमावेशकतेच्या मुल्याचे हनन व्हायला सुरुवात होते .

**ब) जातीवाद :**

भारतीय  लोकशाही मध्ये जात हा घटक अत्यंत महत्वपूर्ण ठरलेला आहे. निवडणुकीमध्ये उमेदवारांच्या निवडीपासून ते मंत्रिमंडळातील स्थान निश्चिती पर्यन्त जात या घटकाने प्रभावशाली भूमिका बजावली असल्याचे आपल्याला दिसते. मतदान करत असताना उमेदवारांच्या गुणात्मक वैशिष्ट्ये लक्ष्यात न घेता त्याची जात प्राधान्याने पाहिली जाते. त्यामूळे लोकशाही व्यवस्थेच्या कार्य क्षमतेवर परिणाम होतो. जातीवादामुळे भारतीय संविधानाने सांगितलेले व्यक्तिमूल्य व व्यक्तीची प्रतिष्ठा राखली जात नाही . जातीवादी प्रवृत्ती ही समाजामध्ये अस्वस्थता व असहकार्य निर्माण करते  व त्याचा थेट परिणाम भारतीय लोकशाही वरती होतो. त्यामुळे जातीवाद हे एक मोठे आव्हान भारतीय लोकशाहीसमोर आहे.

**क) प्रांतवाद :**

भारत हा एक खंडप्राय  देश आहे त्यामुळे प्रादेशिक समतोल साधण्याकरता घटक राज्यव्यवस्था निर्माण केली गेली. परंतु अजूनही प्रादेशिक असमतोल किंवा प्रांतवाद कमी झाला नाही. उत्तर भारत व दक्षिण भारत असा एक वाद कायम चर्चेत असल्याचे आपल्याला दिसते. उत्तर प्रदेश, बिहार येथील लोकाना रोजगारासाठी

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक अशा विकसित राज्यांमध्ये स्थलांतरित व्हावे लागते परंतु अश्या स्थलांतरित लोकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांची प्रदेशावरून त्यांना भेदभावाचा सामाना करावा लागतो . कित्येक वेळेला त्यांच्या विरुद्ध हिंसा झाल्याच्या बातम्या आपण पाहतो. अशा वेळी प्रांतवादा मुळे भारताच्या एकता आणि अखंडतेला इजा पोहचते. प्रांतवादामुळे घटक राज्यांमध्ये विखरी स्पर्धा सुरू होते आणि अशा स्पर्धेतून राज्य एकमेकांना विरोध करू लागतात. त्यामुळे लोकांच्या मूलभूत समस्या बाजूला राहून दोन राज्यांमधील प्रतिष्ठेच्या संघर्षाला सुरुवात होते. त्यामुळे लोकशाही कमकुवत होते. प्रांतवादाच्या प्रवृत्तीमुळे विविध प्रश्नावरून वाद निर्माण होतात उदाहरणार्थ कर्नाटक व तमिळनाडू मध्ये असणारा कावेरी नदीच्या पाणी वाटपाचा वाद. पाणी हे सर्वांसाठी मूलभूत गरज असली तरी माझ्या प्रांतातील लोकांचा त्यावर जास्त अधिकार आहे अशी भूमिका ही लोकशाहीला मारक ठरते.

**ड) भाषावाद :**

भारतामध्ये भाषिक विविधता आहे. विविध राज्यांमध्ये असंख्य भाषा, बोली बोलल्या जातात. भारतामध्ये भाषेचा अभिमान बाळगला जातो त्यातून 'भाषिक श्रेष्ठत्व' या मूल्याला बळ मिळते. आमचीच भाषा श्रेष्ठ अशी भूमिका घेतल्याने इतर भाषिक लोकांचा द्वेष केला जातो. ठराविक राज्यामध्ये ठराविकच भाषा बोलली पाहिजे असा आग्रह धरला जातो त्यामुळे भारतीय समाजातील विविधतेच्या संस्कृतीला आव्हान उभे राहते व कालांतराने लोकशाही व्यवस्थेपुढील आव्हान म्हणून भाषावाद विकसित होतो.

**इ) दहशतवाद :**

धार्मिक संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारा दहशतवाद हे भारतीय लोकशाहीसमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. समाजात धार्मिक तेढ वाढल्यामुळे सामाजिक स्थैर्य नाहीसे होते. दहशत वादामुळे लोकशाहीत प्राप्त होणाऱ्या मानवी अधिकारांचे हनन होते. समाजात अशांतता व असंतोष पसरविण्याचे काम दहशतवादी करत असतात. भारतीय लोकशाहीने निर्माण केलेली राजकीय व्यवस्था अस्थिर करून भारतामध्ये अराजकता माजवणे हा मुख्य उद्देश ठेवून दहशतवादी क्रिया करत असतात.दहशतवादासारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाहीतील सहभाग कमी होतो.

**ई) नक्षलवाद :**

नक्षलवाद ही भारतातील खूप मोठी समस्या आहे. भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरू झाला. या नक्षलवादाने आता उग्र रूप धारण केले आहे. पण यातील शेतकरी-आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व कमी होऊन सरकारला हिंसक पद्धतीने विरोध करणे, पोलीस दलांवर हल्ले करणे, यांसारख्या मार्गांचा वापर नक्षलवादी गटांकडून केला जातो.नक्षलवादी गटाकडून आपल्याच नागरिकांच्या कत्तली करून सरकारविरोधी कृत्य करायला भाग पाडले जाते त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय अखंडतेला मोठे आव्हान उभे राहिले आहे .

**उ) भ्रष्टाचार :**

भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराची समस्या दिसून येते. राजकीय आणि प्रशासकीय स्तरावरील भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होते. सरकारी कामांना लागणारा वेळ, सार्वजनिक सोई व सुविधांची घसरलेली गुणवत्ता, वेगवेगळे आर्थिक घोटाळे यांमुळे एकूण व्यवस्थेबद्दल अविश्वास आणि असमाधानाची भावना लोकांमध्ये निर्माण होते. निवडणूक प्रक्रियेमध्ये होणारा भ्रष्टाचार, बनावट मतदान,

मतदारांना लाच देणे, पळवून नेणे यांसारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो. भ्रष्टाचारही देशाच्या सामाजिक, राजकीय ,धार्मिक दृष्टीने गंभीर समस्या आहे. या समस्येतून जो पर्यन्त आपण बाहेर पडणार नाही तो पर्यन्त देशाची सर्वंकष प्रगती होणे शक्य नाही. भारतात असे एकही क्षेत्र आढळत नाही जिथे भ्रष्टाचार नाही. भ्रष्टाचारांमुळे भारतीय लोकशाहीसमोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

**ऊ) राजकारणाचे गुन्हेगारीकरण :**

राजकीय प्रक्रियेमध्ये गुन्हेगारांचा वाढता सहभाग ही लोकशाही व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी, गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तींना काही वेळा राजकीय पक्षांकडून उमेदवारी दिली जाते. त्यामुळे राजकारणामध्ये पैसा आणि गुंडगिरी यांचे महत्त्व वाढते. निवडणुकीच्या वेळी हिंसाचाराचा वापर होऊ शकतो. सत्ताप्राप्तीच्या साठमारीत विचारप्रणालीच्या राजकारणाचे दारुण पराभव होते. राजकरणामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या वाढत्या आलेखांमुळे त्याचा थेट परिणाम राजकारणातील लोक सहभागावर होताना दिसते. चांगले, कार्यक्षम लोक राजकारणांतील गुन्हेगारी मुळे सहभाग घेण्यास नकार देतात व सत्ता ही गुन्हेगारांच्या हातातील खेळणे बनते अशा वेळी लोकशाही समोर मोठे आव्हान उभे राहते.

**प) लोकांमधील जागरूकतेचा अभाव :**

लोकशाहीच्या यज्ञासाठी सामान्य जनता सतत जागरूक असणे आवश्यक आहे. अखंड जागरूकता ही लोकशाहीसाठी किंमती आहे. प्रतिनिधीक लोकशाहीमध्ये लोक प्रतिनिधींवर सतत लक्ष ठेवूनच त्यांना लोकमताच्या मार्गावर ठेवता येते. जागरूक लोकच असे नियंत्रण ठेऊ शकतील. तेच जर निष्क्रिय व बेफिकीर राहिले तर सत्तेची साधने जवळ असल्याने लोकप्रतिनिधी आपल्या हिताचेच रक्षण करतील हा लोकशाही व्यवस्थेपुढील महत्वाचा प्रश्न आहे मतदानाचा हक्क हे लोकांच्या हातात असलेले हत्यार आहे. त्याचा लोकांनी जागरूकपणे वापर करण्यावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे. लोकांनाच लोकशाही विषयी आस्था नसेल किंवा ईर्षा नसेल तर लोकशाहीला भविष्य राहणार नाही.

**फ) लोकसहभागाच्या मर्यादा :**

लोकसहभागावर लोकशाहीचा जिवंतपणा अवलंबून असतो लोकसहभाग वाढविण्यासाठी समाजात सर्व क्षेत्रात समानता असणे आवश्यक आहे. समाज रचनेत समतल रचना असल्यास सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियांचे क्षेत्र वाढू शकते आणि त्यांचा लोकांवर अधिक प्रभाव पडत असल्याने लोकांची लोकशाही विषयी आस्था अधिक वाढेल.

**भ) प्रसार माध्यमांची भूमिका:**

प्रसार माध्यमे हा लोकशाहीतील चौथा स्तंभ मानला जातो. अर्थात लोकशाहीचा असा स्थंभ अपेक्षित नव्हता पण  माध्यमांची, विषेशतः प्रामाणिक ,तटस्थ माध्यमांची आवश्यकता लोकशाही मध्ये महत्वपूर्ण असते.

**४.० सारांश :**

लोकांचे राज्य म्हणजेच लोकांकडून चालवले जाणारे शासन होय लोकशाहीमधील अंतिम सत्ता सार्वभौमत्व हे लोकांचे असते. राजकीय दृष्टीने तीच अखेरची सत्ता असते. लोक स्वतंत्र होणे आणि ते सक्षम होणे हे लोकशाहीचे ध्येय आहे. आधुनिक काळात अप्रत्यक्ष लोकशाही ही प्रौढ मतदानाच्या हक्कामधून मान्य झालेली आहे. सार्वत्रिक, खुल्या व नियमित निवडणूकांतून लोकांची सत्ता व्यक्त होते आणि राजकीय सत्तेला अधिमान्यता मिळते. आधुनिक भार्तिक लोकशाही ही प्रातिनिधिक संसदीय लोकशाही व्यवस्था आहे. लोकशाही व्यवस्थेची कालसुसंगतता पाहता आधुनिक काळातील समाज व्यवस्थेसाठी लोकशाही व्यवस्था हीच एक राजकीय व्यवस्था म्हणून समर्पक ठरते ज्यामध्ये व्यक्तीच्या अधिकारांचे सरंक्षण करण्याची संपूर्ण हमी देण्यात आली आहे. भारतीय लोकशाही व्यवस्था लोकशाहीच्या आदर्श प्रारुपाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे म्हणता येईल.आदर्श समाजव्यवस्था निर्माण करावयाची असल्यास राजकीय व्यवस्था ही परिपक्व व स्थिर असायला हवी. लोकशाही व्यवस्था ही स्थिर व उत्तरदायी राजकीय व्यवस्था निर्माण करते त्यामुळे लोकशाही व्यवस्थेचे विशेष महत्व आहे.

**५.० पारिभाषिक शब्द**

**१) प्रातिनिधिक लोकशाही –** लोकांद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींच्याद्वारे चालवली जाणारी लोकशाही.

**२) नक्षलवाद –** भारतातील काही घटक राज्यांमध्ये अतिडाव्या विचारांनी प्रेरित हिंसक चळवळ.

**३) बहुमताचे शासन –** एकूण संखेच्या निम्म्या पेक्षा अधिक सदस्यांचा पाठींबा असणारे शासन.

**४) सत्ता विभाजन –** केंद्र व घटक राज्यांमध्ये अधिकारांचे वर्गीकरण

**५) प्रांतवाद –** देशांतर्गत दोन प्रादेशिक घटका मधील संघर्ष

**६.० स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे :**

**१) भारतीय संसदेमध्ये खालीलपैकी कोणते घटक समाविष्ट होतात?**

अ) लोकसभा

ब) राज्यसभा

क) राष्ट्रपती

ड) वरील सर्व

**२) खालीलपैकी कोणत्या देशामध्ये प्रातिनिधिक लोकशाही नाही?**

अ) उत्तर कोरिया

ब) भारत

क) फ्रान्स

ड) जर्मनी

**३) कोणत्या लोकशाही पद्धती मध्ये शासनप्रमुख कायदे मंडळाला जबाबदार असतो?**

अ) अध्यक्षीय

ब) संसदीय

क)वरीलपैकी दोन्ही

ड) वरीलपैकी एकही नाही

**४) भारतीय लोकशाही समोरील खालीलपैकी कोणते आव्हान आहे?**

अ) विविधता

ब) धर्मनिरपेक्षता

क) जमातवाद

ड) समाजवाद

**५) लोकशाहीचे खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य आहे?**

अ) लोकशाही हे लोकांचे राज्य आहे.

ब) मर्यादित प्रतिनिधित्व

क) धर्मांधता

ड) वरीलपैकी एकही नाही.

**स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे**

१) ड) वरील सर्व

२) अ) उत्तर कोरिया

३) ब) संसदीय

४) क) जमातवाद

५) अ) लोकशाही हे लोकांचे राज्य आहे.

**७.० सरावासाठी स्वाध्याय**

**अ) टिपा लिहा**

१) आधुनिक भारतीय लोकशाही व्यवस्था

२) प्रातिनिधिक लोकशाही

३) लोकशाहीचे प्रकार

४) भारतीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठीआवश्यक बाबी.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) आधुनिक भारतीय लोकशाहीची वैशिष्ट्ये सांगून लोकशाही व्यवस्थेचे परीक्षण करा.

२) अध्यक्षीय लोकशाही व संसदीय लोकशाही व्यवस्थेतील फरक सविस्तर स्पष्ट करा.

३) भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचा सविस्तर आढावा घ्या

## ८.० संदर्भसूची

१) व्होरा राजेंद्र , पळशीकर सुहास (दु.आ.२०२४), भारतीय लोकशाही  अर्थ आणि व्यवहार , डायमंड पब्लिकेश, पुणे.

२) भोळे.भा.ल. (२०२१), भारतातील गणराज्याचे शासन आणि राजकारण,पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर.

३) Kashyap Subhash (Re.2017) Our Political Sysyem, NBT,New Delhi,

४) Laxmikant M. (Re.2024), Indian Polity, McGraw Hill, Chennai.

५) Altekar -.S.,(1958), State Government in India, Motilal, Delhi.

❑❑❑